**ठळक बातम्या**

- राष्ट्रपिता महात्मा गांधी आणि माजी प्रधानमंत्री लाल बहादूर शास्त्री यांच्या जयंतीनिमित्त त्यांना देशाची आदरांजली

- खादी-ग्रामोद्याेग आयोगाची उलाढाल गेल्या ९ वर्षांत चौपटीनं वाढल्याचं केंद्रीय मंत्री नारायण राणे यांचं प्रतिपादन

- यंदाचा वैद्यक शास्त्रातला नोबेल पुरस्कार, कोरोना प्रतिबंधक mRNA प्रकारच्या लशींच्या निर्मितीसाठी संशोधन करणाऱ्या जोडीला जाहीर

- बुलडाणा जिल्ह्यात ५ मजुरांचा अपघाती मृत्यू, ५ जखमी

**आणि**

- आशियाई क्रीडा स्पर्धेत भारताची आज २ रौप्य आणि ५ कांस्य पदकांची कमाई

**<><><><><><><>**

देशभरात आज राष्ट्रपिता महात्मा गांधी आणि माजी प्रधानमंत्री लाल बहादूर शास्त्री यांना जयंतीनिमित्त आदरांजली वाहण्यात आली. देशासह जगभरात विविध कार्यक्रम आयोजित केले आहेत.

नवी दिल्लीत महात्मा गांधी यांच्या राजघाट या समाधीस्थळी आज सर्वधर्म प्रार्थना झाली. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, उपराष्ट्रपती जगदीप धनखड

आणि प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज सकाळी राजघाट इथं जाऊन पुष्पांजली अर्पण केली. राष्ट्रपती, उपराष्ट्रपती आणि प्रधानमंत्र्यांनी विजय घाटावर जाऊन लालबहादूर शास्त्री यांना श्रद्धांजली वाहिली.

गुजरात मध्ये आज गांधी जयंतीनिमित्त मुख्यमंत्री भूपेंद्र पटेल यांनी सर्वधर्मीय प्रार्थनेत सहभाग घेतला. साबरमती आश्रमात देखील आज विविध कार्यक्रम आयोजित केले होते.

**<><><><><><><>**

राज्यपाल रमेश बैस यांनी आज राजभवन इथं बापूजी आणि शास्त्रीजींच्या प्रतिमेला पुष्पांजली वाहून अभिवादन केलं. राजभवन परिसरात आज स्वच्छता अभियान राबवण्यात आलं. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार यांनीही महात्मा गांधी आणि लालबहादूर शास्त्री यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केलं. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी वर्धा इथं महात्मा गांधी यांचं वास्तव्य राहिलेल्या सेवाग्राम आश्रमाला भेट दिली आणि प्रार्थना केली.

**मुंबईत** दहिसरमधल्या पंडित दीनदयाल उपाध्याय उद्यानात स्वच्छता अभियान राबवण्यात आलं.

**सोलापुरात** आमदार प्रणिती शिंदे यांनी महात्मा गांधी यांच्या पुतळ्याला आणि **लालबहादूर** शास्त्री यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण केला. **गोंदियात** आज युवकांनी शांतीचा संदेश देण्यासाठी सायकल रॅली काढली

आणि माझी वसुंधरा अभियानाअंतर्गत पर्यावरणपूरक उपक्रम आयोजित केले. **यवतमाळ**मध्ये शांती सलोखा सद्भावना रैली काढण्यात आली.

**धुळे** महापालिकेच्या स्वच्छता पंधरवड्याचा आज समारोप झाला. तर **नांदेड** मध्ये स्वच्छता फेरी काढण्यात आली.

**<><><><><><>**

स्वच्छता आणि सरकारी कार्यालयातील प्रलंबित कामांचा निपटारा यावर लक्ष केंद्रित करणाऱ्या विशेष मोहीमेचा तिसरा टप्पा आजपासून सुरू झाला. ३१ ऑक्टोबरपर्यंत ही मोहिम सुरू राहणार आहे. या मोहिमेअंतर्गत राज्यात विविध ठिकाणी साफ सफाई मोहिमेचं आयोजन करण्यात आलं होतं. आकाशवाणी मुंबईच्या कार्यालयातही विविध विभागातल्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी परिसराची स्वच्छता केली.

**<><><><><><>**

२०१४-१५ मधे खादी आणि ग्रामोद्योग आयोगाची 30 हजार कोटी रूपयांची उलाढाल झाली असून ती आज १ लाख ३४ हजार कोटी रुपयांवर गेली आहे, असं केंद्रीय सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग मंत्री नारायण राणे यांनी सांगितलं. ते आज मुंबईत खादी महोत्सवाचं उद्घाटन करताना बोलत होते. गेल्या काही वर्षात खादी आणि ग्रामोद्याेग क्षेत्रात भरीव वाढ झाली आहे. देशाच्या अर्थव्यवस्थेत मुंबईचं योगदान 34 टक्के आहे. यात खादी आणि ग्रामोद्योग यांचाही मोठा वाटा यापुढच्या काळात असावा, असं ते म्हणाले.

महात्मा गांधी यांनी खादीला स्वातंत्र्य आंदोलनाशी जोडलं, खादीच्या प्रसाराचं कार्य आपल्याला पुढं न्यायचं आहे, असंही राणे म्हणाले.

३१ ऑक्टोबरपर्यंत हा महोत्सव चालणार असून त्यात स्वदेशी उत्पादनांना चालना देण्यासाठी प्रदर्शन भरवलं जाणार आहे. तिथं ग्राहकांना २० ते २५ टक्के सवलतीनं ही उत्पादनं मिळतील.

<><><><><><>

राज्यातल्या शेतकऱ्यांच्या खात्यात पीक विम्याच्या नुकसान भरपाईच्या देय रकमेची २५ टक्के रक्कम दिवाळीपूर्वी जमा करण्याचा राज्य शासनाचा प्रयत्न असल्याचं कृषीमंत्री धनंजय मुंडे यांनी आज सांगितलं. २३ सप्टेंबर रोजी झालेल्या पावसानंतर शेतीच्या नुकसानीचा आढावा घेण्यासाठी ते नागपुरात आले होते. त्यावेळी ते बोलत होते. त्यांनी अडयाळी, उमरगाव, पाचगाव, विरखंडी या गावांची पाहणी केली.

<><><><><><>

'माझी माती माझा देश' उपक्रमांतर्गत आज नवी मुंबईत नॅशनल सिक्युरिटी गार्ड संस्थेनं नवी मुंबई महानगरपालिका मुख्यालयाला भेट दिली. नवी मुंबईचे महापालिका आयुक्त राजेश नार्वेकर यांच्या हस्ते यावेळी अमृत कलशात माती संकलित करण्यात आली.

<><><><><><>

स्वच्छता हीच सेवा अभियान आणि महात्मा गांधी यांच्या जयंतीचं औचित्य साधत आज नाशिकमध्ये जलतज्ज्ञ राजेंद्रसिंह यांच्या

मार्गदर्शनाखाली अविरल गोदावरी अभियानाचा प्रारंभ झाला. आगामी सिंहस्थ कुंभमेळा २०२७ ला होणार असून तोपर्यंत गोदावरी नदीला प्रदूषण आणि प्लास्टिकमुक्त करण्याचा संकल्प यावेळी उपस्थितांनी केला.

<><><><><><>

कोरोना प्रतिबंधक mRNA प्रकारच्या लशींच्या निर्मितीसाठी संशोधन करणाऱ्या जोडीला यंदाचा वैद्यक शास्त्रातला नोबेल पुरस्कार जाहीर झाला आहे. अमेरिकेतल्या पेनसिल्वेनिया विद्यापीठात कार्यरत मूळच्या हंगेरीच्या प्रा. कॅटलिन कारिको आणि अमेरिकन शास्त्रज्ञ ड्रू वेसमन हे या पुरस्काराचे मानकरी आहेत. कोरोनापूर्वीही प्रायोगिक तत्त्वावर हे तंत्रज्ञान वापरात होते. मात्र आता लाखो लोकांना याचा लाभ होतो आहे. कर्करोगासह इतर आजारांच्या उपचारांवरही या तंत्रज्ञानाचा वापर करता येईल का, यावर सध्या संशोधन सुरू आहे.

<><><><><><>

रोजगाराच्या शोधात मेळघाटातून बुलडाणा जिल्ह्यात गेलेल्या १० मजुरांना आज पहाटे नांदुरा नजीक अपघात होऊन त्यातले पाच जण जागीच ठार, तर इतर पाच जखमी झाले. जखमींवर मलकापूरच्या शासकीय रुग्णालयात उपचार सुरू आहेत. राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ६ जवळ वडनेर भोलजी फाट्याजवळ हे मजूर झोपडीत झोपले असताना त्यांना भरधाव ट्रकनं चिरडलं. चिखलदरा तालुक्यातल्या मोरगावचे हे मजूर नांदुरा इथं आल्यानंतर रस्त्याचं काम करत होते.

**<><><><><><>**

आशियाई क्रीडा स्पर्धेत बीडच्या अविनाश साबळेनं काल सुवर्णपदक पटकावलं. त्याबद्दल आकाशवाणीशी बोलताना त्याचे वडील मुकुंद साबळे यांनी आनंद व्यक्त केला…

**होल्ड - मुकुंद साबळे बाइट**

**<><><><><><>**

महात्मा गांधी जयंतीचं औचित्य साधून अहमदनगर जिल्ह्यात नेवासा इथं त्रिमूर्ती शैक्षणिक संकुलात महात्मा गांधी जीवनदर्शन चित्र प्रदर्शनाचं आज उद्घाटन झालं. या दोन दिवसीय प्रदर्शनाला पहिल्या दिवशीच सुमारे ५ हजारपेक्षाही जास्त लोकांनी भेट दिली. माहिती आणि प्रसारण मंत्रालयाचा अहमदनगरचा केंद्रीय संचार ब्यूरो आणि त्रिमूर्ती पावन प्रतिष्ठान यांनी हे प्रदर्शन आयोजित केलं आहे. या प्रदर्शनात गांधीजींचा संपूर्ण जीवनप्रवास छायाचित्रांच्या माध्यमातून दर्शवला आहे.

**<><><><><><>**

नाशिक जिल्ह्यात विंचुर पाठोपाठ निफाड उपबाजारात देखील कांदा लिलाव सुरू झाल्यानं शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे. कांदा निर्यात शुल्कातली ४० टक्के वाढ रद्द करावी, नाफेडनं खरेदी केलेला कांदा देशांतर्गत बाजारपेठेत विकू नये, यासह विविध मागण्यांसाठी २० सप्टेंबरपासून नाशिक जिल्हा कांदा व्यापारी संघटनेनं लिलाव बंद आंदोलन पुकारलं होतं. मात्र, याआधी विंचूर उपबाजारात कांदा लिलाव सुरू

झाल्यानंतर चार दिवसातच ८० हजार क्विंटल लिलाव झाले असून सरासरी २१०० रूपये भाव मिळत आहे. निफाड मध्ये आज १८०० क्विंटल कांद्याचे लिलाव झाले आणि दोन हजार रूपये सरासरी भाव मिळाला.

**<><><><><><>**

कारखान्याला नोटीस या कारवाईला कोणीही राजकीय स्वरूप देऊ नये असं उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी म्हटलं आहे. ते आज बारामती इथं बातमीदारांशी बोलत होते. नोटीस देणारी यंत्रणा त्यांचं काम करते, असं बारामती ॲग्रोवरील कारवाईबाबत त्यांनी सांगितलं.

**<><><><><><>**

ओबीसींवर अन्याय होऊ नये, अशीच राज्यशासनाची भूमिका आहे. बिहारमधे झालेल्या जातिनिहाय सर्वेक्षणाचा अहवाल अभ्यासून नंतरच राज्यात कशा प्रकारे सर्वेक्षण करावं याचा निर्णय घेऊ, असं उपमुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी सांगितलं आहे. बिहारच्या सर्वेक्षणाचा अहवाल आज प्रसिद्ध झाला. त्या पार्श्वभूमीवर ते मुंबईत बोलत होते. जातीआधारित सर्वेक्षण प्रथमच करण्यात आलं आहे, असं ते म्हणाले.

**<><><><><><>**

मराठा समाजाला ओबीसी प्रवर्गातून आरक्षण देऊ नये, अशीच मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री आणि सर्व पक्षांच्या नेत्यांची भूमिका आहे असं अन्न आणि नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांनी म्हटलं आहे. ते आज नाशिक मध्ये बातमीदारांशी बोलत होते. ओबीसी समाजाचं आरक्षण कायम ठेवून

अन्य शिल्लक आरक्षणातून मराठा समाजाला आरक्षण द्यावं, अशी आपल्यासह सर्वांची भूमिका असल्याचं त्यांनी सांगितलं.

**<><><><><><><>**

कोकणात काही ठिकाणी काल मुसळधार तर तुरळक ठिकाणी जोरदार पाऊस पडला. मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यातही तुरळक ठिकाणी अतिवृष्टी झाली. येत्या दोन दिवसांत कोकण, मध्य महाराष्ट्र आणि विदर्भात तुरळक ठिकाणी पावसाची शक्यता असल्याचं हवामान विभागानं म्हटलं आहे. याच कालावधीत मराठवाड्यातलं हवामान कोरडं राहील असा अंदाज आहे.

**//<><><><><><><>//**